
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

● वर्ष :९० ● मार्च २०२२ ● पुरवणी विशेषांक ०९





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

# सामाजिक इतिहासाचे महत्त्व व समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास

प्रा. हरिदास शंकर जाधव

विभागप्रमुख, इतिहास व प्रा.भा.इ.सं. व पुरातत्वशास्त्र विभाग,

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, जि. पुणे

Mail Id- jadhavharidas@gmail.com

**प्रस्तावना :**

पूर्वीच्या शतकात जसे मानले गेले तसे इतिहास म्हणजे केवळ राजकीय इतिहासाचा अभ्यास करणे[१] वा त्यालाच मुख्य इतिहास धारा मानणेहे योग्य नाही, म्हणून त्याविरुद्ध जोरदार चळवळ झाली. व्यापक इतिहासात मानवी समाज-जीवन आले पाहिजे असे अगदी इतिहासाचा पिता', हेरोडोटसही अप्रत्यक्षपणे म्हणतो.[२] जगाच्या निरनिराळ्या भागांतील कित्येक इतिहासकारांनी ही इतिहासभानाची दृष्टी व जाणीव दाखविलेली आहे. खरे तर इतिहास सर्व लोक मिळून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे घडवीत असतात. शासकीय/राजाची वा सरकारी धोरणे आणि कायदे यांच्याइतके किंवा त्याहूनही अधिक महत्त्व लोकांच्या दैनंदिन जीवन आणि चालीरीतीना असते. असा सर्वांगीण इतिहास लिहिला गेल्यास तो निश्चितच वेगळ्या प्रकारचा व बराच वास्तववादी आणि मानवी जीवनातील घडामोडींची अधिक चांगली कल्पना देणारा होईल त्यातही शंका नाही.[३] मानवी समाज गतिमान आहे. तो समाज किंवा एखादा गट कुठल्या अवस्थेतून जातो, आणि शेवटी त्याचे काय होते याचे संपूर्ण चित्र काही इतिहास-भाष्यकार देतात. समाजाच्या स्थिती-गतीचे हे नियम ठरलेले आहेत. चाकोरी ठरलेली असते. ही चाकोरी कोण निर्माण करते? याची उत्तरे अर्थातच प्रत्येकाची वेगवेगळी असतात. या सर्व उत्तरातून इतिहासाचा एक वेगळा अर्थ समजू शकतो. सामाजिक दृष्टीने इतिहासाचा अर्थ मांडण्याचा प्रयत्न सुमारे तीनशे वर्षांपूर्वी झाला. याचा पहिला काहीसा शास्त्रीय प्रयत्न इटालियन इतिहासकार व्हीको याने इ.स.१७२५ मध्ये प्रकाशित झालेल्या न्यू सायन्स या ग्रंथात केला[४]. व्हीको हा काहीसे वेगळे लेखन करणारा विचारवंत होता. आपल्या काळातील इतिहास-लेखन व इतिहासलेखनशास्त्रपद्धतीवर त्याने टीका केली, भूतकाळातील सर्व घटना भव्य दिव्य होत्या या विचारावर त्याने मोठा आक्षेप घेतला[५]. इतिहासात लेखक पक्षपाती असू शकतात तसेच मिथकीय किंवा पारंपरिक इतिहासात आणि दंतकथांतही ऐतिहासिक माहिती असू शकते आणि ती नीट पारखून घेऊन तिचा योग्य तो उपयोग झाला पाहिजे. अशा प्रकारचे अनेक नवनवीन समाजशास्त्रीय विचार मांडणारा हा विचारवंत होता. मात्र समाजजीवनाचा अभ्यास करू पाहणाऱ्यास त्याच्या काही अवस्था असल्याचेही जाणवते. प्रत्येक संस्कृती व समाज एका ठराविक अवस्थेतून जात असतो. पहिल्या अवस्थेत गरज म्हणून माणसे काही गोष्टी निर्माण करतात. सर्व गरजा भागल्या की सुखाकडे पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. सुखोपभोग मिळाला की समाज चैनी बनतो. त्या चैनीतून अनाचार उद्भवतात. माणसे बेताल बनतात. त्यातून ज्या कृती होतात त्यांची परिणती विनाशातच होते असाही एक विचार जो काहीसा नियतीवादी होता असा मांडला गेला. इतिहासाचे काही प्रमुख टप्पे किंवा वळणे मानली गेली आहेत. आधुनिक पूर्व विचारात देवयुग, वीरयुग आणि लोकयुग असे मोठे कालखंड कल्पिण्यात आले होते. या प्रत्येकाची युगाची म्हणून काही खास वैशिष्ट्ये होती. या अवस्थांचे ज्ञान झाल्याखेरीज इतिहास समजणे अवघड आहे. अशी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहासाची मांडणी नंतरच्या काळात स्पेंग्लर या जर्मन शास्त्रज्ञाने करण्याचा प्रयत्न केला[६]. मानवी समाजाच्या अभ्यास व पाहणीतून त्याने एक सूत्र शोधले. त्याच्या 'डिक्लाइन ऑफ दि वेस्ट' या ग्रंथात ते मांडलेले आहे. मानवी भावी इतिहासाचे, नंतर घडणाऱ्या बारीक-सारीक गोष्टींचे तपशीलवार भाकीत आपण करू शकतो असे स्पेंग्लर याचे म्हणणे होते. त्यासाठी समाजाचा इतिहास हाच खरा इतिहास हे सूत्र मान्य केले पाहिजे असे त्याने म्हणले आहे. समाजजीवन काही दृढ अशा नियमानुसार चालत असते. सर्व मानवी समाजास एकच इतिहास आहे असे मात्र नाही. इजिप्तपासून ते आधुनिक पाश्चात्त्य जीवनापर्यंत मानवी जीवनाचे आठ भाग त्याने कल्पिलेले होते. त्या भागांना स्वतंत्र संस्कृतीचा दर्जा त्याने दिलेला होता. प्रत्येक संस्कृतीचे शरीर व आत्मा, स्वतंत्र व वेगळा असा मानला आहे. जीवनसाधनात, जीवन-तत्वज्ञानात, सत्यसृष्टीत आणि त्यांच्या कल्पनासृष्टीत ते जाणवत असते. प्रत्येक संस्कृतीचे विशिष्ट असे जीवनक्रम आहेत. त्याचे अस्तित्व त्या त्या संस्कृतीच्या जन-जीवनातील जीवनक्रमाचे ज्ञान दुसऱ्या समाजास होणे तसे

ISSN No. 2394-5990

अवश्य आहे. सर्व संस्कृती एकमेकीपासून अगदी निराळ्या असल्या तरी प्रत्येक संस्कृतीचा जीवनमान एकच असतो. प्रत्येक मानवी शरीर जन्म, बाल्य, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य आणि मृत्यू ह्या अवस्थेतून जाते. तद्वतच समाज-जीवनास ह्या निरनिराळ्या अवस्थेतून जावे लागते. मानवी जीवन ज्याप्रमाणे एका ठराविक कालमानाचे असते तसेच समाजजीवनाचेही आहे. संस्कृतीच्या जीवनातसुद्धा बालजीवनातील उत्साह, तारुण्यातील कर्तृत्व, प्रौढावस्थेतील संयम आणि वृद्धावस्थेतील थंडपणा असे सर्वच प्रकार पाहावयास मिळतात. हया वैशिष्ट्यांवरून एखाद्या संस्कृतीचा विनाशकाल सुद्धा सांगता येइल. अशाच प्रकारची समाजशास्त्रीय भूमिका घेऊन अर्नोल्ड टॉयन्बी यांनी एक सूत्र मांडून संस्कृतीचे गतिनियम मांडण्याचा प्रयत्न केला[७]. टॉयन्बीने एकूण एकवीस विविध संस्कृतींच्या अभ्यासातून आपली सूत्र उभारली आहेत. त्यांनी प्रत्येक संस्कृतीच्या निरनिराळ्या टप्प्यांचा सूत्ररूपाने एक आराखडा तयार केला. उदय, उत्कर्ष, विस्तार व विनाश अशा टप्प्यांतून प्रत्येक संस्कृती जात असते. आवाहन व त्यास प्रतिसाद हे त्याच्या एकंदर मांडणीचे मुख्य तत्त्व आहे. सोरोकिन या विचारवंतानेही अशीच अवस्था मानवाच्या समाज-जीवनात असते असे विचार मांडलेले आहेत. प्रथम एक आध्यात्मिक जीवनपद्धतीची अवस्था, त्यामागून ऐहिकतेकडे काहीशी वळलेली अशी एक स्थिती व शेवटी पूर्णतः ऐहिकतेकडे वळलेली जीवनाची अवस्था आलटून-पालटून हयाच तीन अवस्थांतून मानवी समाज-जीवन प्रवास करीत असते असे त्यांनी मांडले. तसेच हे जीवन घड्याळाच्या लंबकाप्रमाणे प्रवास करीत असते असे सोरोकिन मानतात[८]. या परिवर्तनास घटक जबाबदार नसतात तर समाजाच्या संघशक्तीने हे सारे घडत असते. समाजाची संघशक्ती हे कारण नसून ते एक साधन आहे. हे साधन संघशक्तीने निर्माण होते. त्याचे कारण म्हणजे हे गतिनियम हेच होय.

इतिहासाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पद्धतशीर विवेचन करण्याचे व त्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अन्वयार्थ मांडण्याचे श्रेय फ्रेंच समाजशास्त्रज्ञ कॉम्ट यास द्यावे लागते[९]. समाजशास्त्राचा जनक म्हणून ओळखला जाणारा कॉम्ट विधायक-निश्चियात्मक विचारसरणीचा होता. कॉम्टनेही मानवी प्रगतीच्या तीन अवस्था मानलेल्या आहेत: धार्मिक, भौतिक आणि वैज्ञानिक[१०]. ह्या तीन अवस्थांतून जाणारी मानवाच्या व त्याच्या समाजाची प्रगती अटळ व अपरिवर्तनीय अशी आहे. कॉन्टेच्या तीन अवस्था सूत्राने इतिहासाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी व पद्धती उदयास आली. त्याचा प्रभाव फार मोठा होता. मानवी इतिहासाची सामाजिक पार्श्वभूमी कॉम्टने फार महत्त्वपूर्ण आहे हे दाखवून ही ज्ञानशाखा भक्कम बनविली. मानवी समाजात मानवता हा त्याचा आत्मा आहे. समाज परिवर्तनीय बनविण्यासाठी परस्परांचे साहाय्य व सहकार्य घेते. त्याचप्रमाणे सामाजिक समाजजीवनाचे नियम व क्रम अभ्यासण्यासाठी कॉम्ट याने दाखवून दिलेली पद्धती अत्यत उपयुक्त आहे. सामाजिक पुनर्सघटन करण्यासाठी या तत्वाची जाण असणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते[११].

**सारांश :**

समाज-जीवनाचा परिपूर्ण अभ्यास म्हणजे इतिहास. राजकीय इतिहास म्हणजेच सर्वस्व नाही.समाज-जीवनाच्या प्रगतीचे सूत्ररूपाने विवेचन करण्याचे अनेक प्रयत्न झाले. इटालियन विचारवंत व्हिको हा या अभ्यास-पद्धतीचा प्रमुख[१२]. त्यानंतर स्पेंग्लर, टॉयन्बी, सोरोकिन इत्यादींनी गतिनियम मांडून त्यांचे एक सूत्र देण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच विचारवंत व समाजशास्त्रज्ञ कॉम्त यानेमात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहासाचा अभ्यास करण्याची ठाम भूमिका प्रस्थापित केली. सर्व विचारवंतांच्या कार्यातून सामाजिक इतिहासाचे ज्ञान समृद्ध व विशाल बनले.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक इतिहास या घटकाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. वर्ग, जात ,संप्रदाय सामाजिक अवस्था, समानता, कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक गतिशीलता, लिंगभाव, आधुनिकीकरण, उत्तर-आधुनिकिकरण, संरचनावाद[१३] या घटकांचे महत्त्व इतिहासाच्या अभ्यासामध्ये सामाजिक इतिहास या ज्ञानशाखेमुळे वाढले. सध्याच्या काळात समाजशास्त्राचा इतिहास तसेच सामाजिक इतिहास या शाखांमध्ये मानवशास्त्र, सांस्कृतिक अध्ययन याही परिप्रेक्षयांचा समावेश झालेला आहे.

**संदर्भ सूची :-**


1. B. Shaikh -li, History Its Theory and Method, Macmillan India, 1993, Madras, p. 05.
2. Lionel Scott, Historical Commentary on Herodotus Book, Brill, Boston, 2005, p.672.
3. Jean-Pierre V. M. Hµrube, Annales Historiography and Theory -- Selective and -nnotated Bibliography, Greenwood Press, USA, 2005.
4. THE NEW SCIENCE OF GI-MB-TTIST-VICO Unabridged Translation of theThird Edition (1744) with the addition of Practice

of the New Science, Cornell University Press, 2016.

५. कित्ता.

६. Oswald Spengler, Decline of the West , Vintage Books, 2006.

7. E.W.Tomlin, -rnold Toyanbee : Selections from his works, Oxford University Press, London, 1978.

८. म.ए. कुलकर्णी, इतिहासलेखनशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे, पृ. ८१.

९. कित्ता, पृ. ८२.

१०. B.Shaikh Ali, History Its Theory and Method, Macmillan India, 1993, Madras, p. 284.

११. कित्ता .

१२. THE NEW SCIENCE OF GI-MB-TTIST-VICO Unabridged Translation of the Third Edition (1744) with the addition of Practice of the New Science, Cornell University Press, 2016.

१३. या विषयाच्या सविस्तर चर्चेसाठी पहा - गोपीचंद नारंग, संरचनावाद, उत्तर संरचनावाद व प्राच्य काव्यशास्त्र, साहित्य अकादमी, दिल्ली,२०००.

• • •